**आकाशवाणी पुणे**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**पुणे वृत्तांत**

**वेळ - संध्याकाळी 06.00 वा.**

**दिनांक- 02.08.2025** **वार- शनिवार**

---

## किसान

प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेच्या २० व्या हप्त्याचं वितरण पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते आज वाराणसी इथून ऑनलाइन पद्धतीनं झालं. यावेळी पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत कृषीमंत्री दत्तात्रय भरणे दूरस्थ पद्धतीनं उपस्थित होते. यानंतर त्यांनी घेतलेल्या कृषी विभागाच्या आढावा बैठकीत विभागाची रचना, कृषी विद्यापीठं आणि त्याअंतर्गत विभाग, संशोधन केंद्रं, महाबीजसह महामंडळं, कृषी तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणा, वेगवेगळे विभाग आदींची संक्षिप्त माहिती कृषी आयुक्त सूरज मांढरे यांनी दिली.

'पीएम किसान सन्मान निधी' योजनेचे राज्यात नोंदणीकृत १ कोटी २३ लाख ९२ हजार लाभार्थी असून २० व्या हप्त्यासाठी ९६ लाख ५१ हजार लाभार्थ्यांच्या खात्यात प्रत्येकी २ हजार रुपये जमा करण्यात आले असं मांढरे यांनी सांगितलं. यापैकी पुणे जिल्ह्यातील ४

लाख ५१ हजार ८५० शेतकऱ्यांच्या खात्यात विसाव्या हप्त्याचे ९० कोटी ३७ लाख रुपये जमा करण्यात आले.

## खते

खत कंपन्या शेतकऱ्यांना खतांसोबत इतर उत्पादनांची सक्तीनं विक्री करत असल्यानं शेतकऱ्यांच्या उत्पादन खर्चामध्ये वाढ होते. अशाप्रकारे विभागातील पुणे, सातारा आणि अहिल्यानगर जिल्ह्यातील खत कंपन्या सक्तीनं विक्री करत असल्यास शेतकऱ्यांनी कृषी विभागाकडं तक्रार नोंदवावी, असं आवाहन विभागीय कृषी सहसंचालक दत्तात्रय गावसाने यांनी केलं आहे.
शेतकऱ्यांकडून प्राप्त होणाऱ्या तक्रारींची गुण नियंत्रण निरीक्षकांमार्फत शहानिशा करून तक्रारीत दोषी आढळून आलेल्या घाऊक किरकोळ विक्रेते यांच्याविरुद्ध कारवाई करण्यात येईल असंही त्यांनी सूचित केलं आहे.

## रेशीम

'रेशीम ग्राम' संकल्पनेच्या माध्यमातून रेशीम शेतीमुळं ग्रामीण भागातील शेतकरी, सुशिक्षित बेरोजगारांकरिता रोजगार निर्मिती आणि त्यांचं आर्थिक सक्षमीकरण यासाठी पुणे जिल्ह्यातील अधिकाधिक शेतकरी आणि उद्योजकांनी रेशीम शेती उद्योगात सहभागी व्हावं, असं आवाहन वस्त्रोद्योग विभागाच्या प्रधान सचिव अन्शु सिन्हा यांनी केलं आहे. खेड तालुक्यातील वाकी इथल्या सिल्कबेरी  केंद्राला काल भेट दिल्यानंतर

त्या बोलत होत्या. शेतकरी उत्पादक कंपनीच्या माध्यमातून तुती लागवडीपासून रेशीम वस्त्र निर्मितीपर्यंत अखंड मूल्यवर्धित साखळी तयार केल्यास जिल्ह्यात रेशीम शेती उद्योग वाढीला गती मिळेल. एक एकर तुतीची लागवड केल्यास पाच लोकांना वर्षभर रोजगार मिळवून देण्याची क्षमता यामध्ये आहे असंही सिन्हा म्हणाल्या.

**पीक-पाहणी**

खरीप हंगामातील शेतकरी स्तरावरील पीक पाहणी सुरू झाली आहे. याची मुदत 14 सप्टेंबरपर्यंत असणार आहे. तथापि, शेतकऱ्यांनी सहाय्यकांवर अवलंबून न राहता शक्य तितकी पीक पाहणी स्वतःच मुदतीच्या आत पूर्ण करावी असं आवाहन कृषी विभागानं केलं आहे.

**कौशल्य**

महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र आणि यशस्वी अकॅडमी फॉर स्किल्स यांच्यादरम्यान, कौशल्य प्रशिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांचा उद्योजकता विकास करण्यासाठी सामंजस्य करारावर स्वाक्षरी करण्यात आली. या करारानुसार महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्रांचे विविध प्रशिक्षण उपक्रम 'यशस्वी' संस्थेतर्फे राबविण्यात येणार आहेत. तसंच यशस्वी संस्थेच्या कौशल्य विकास केंद्रामधील विविध प्रकारचं कौशल्य विकास प्रशिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्राचे तज्ञ मार्गदर्शन करणार आहेत.

**बालकुमार**

चारित्र्यवान पिढी घडण्यासाठी बालवयापासून मुलांना वाचनाची गोडी लावणं आवश्यक आहे, वाचनातून जिज्ञासा वाढीस लागते आणि त्यातूनच आकलन वाढते असं मत ज्येष्ठ साहित्यिक लक्ष्मीकांत देशमुख यांनी आज पुण्यात व्यक्त केलं. पुण्याच्या अखिल भारतीय मराठी बालकुमार साहित्य संस्थेतर्फे 2024 वर्षासाठी राज्यस्तरीय विविध साहित्य पुरस्कारांचं वितरण करताना  ते बोलत होते.

पुरस्कारप्राप्त लेखकांच्या वतीनं मनोगत व्यक्त करताना कल्पना मलये म्हणाल्या की, बालसाहित्यविषयक क्षेत्रात गेली ५० वर्षं कार्य करणाऱ्या मातृसंस्थेकडून पुरस्कार मिळणं ही आनंदाची बाब आहे. बालकांचं भावविश्र्व समजून घेत त्यांच्यासाठी साहित्यकृती निर्माण करणं ही अवघड गोष्ट आहे असंही त्यांनी नमूद केलं.

**ड्रोन**

पुण्यातील माधव सदाशिव गोळवलकर गुरुजी विद्यालयात काल रोटरी क्लब ऑफ पुणे विस्डम - इंटरॅक्ट क्लब आणि ऑबीयुंटस्टेप्झ यांच्याद्वारे ड्रोन निर्मितीसंदर्भातील प्रशिक्षण कार्यशाळा घेण्यात आली. ड्रोन क्षेत्रातील करिअरच्या संधीं विद्यार्थ्यांना माहिती होण्याच्या उद्देशानं तसंच राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या अनुषंगानं विद्यार्थ्यांना हे प्रशिक्षण देण्यात आल्याचं प्रशालेच्या स्टेम लॅबच्या समन्वयक सोनल एरंडे यांनी सांगितलं.

**खान्देश**

खान्देशच्या मातीचा सुगंध आणि संस्कृतीचा वारसा पुढील पिढीपर्यंत पोहोचावा या हेतूनं पिंपरी-चिंचवडमध्ये 'खान्देश सार्वजनिक श्री कानबाई माता उत्सवाचं आयोजन करण्यात आलं आहे. आजपासून तीन दिवस वाल्हेकरवाडी इथं होणारा हा उत्सव केवळ एक धार्मिक कार्यक्रम नसून, पिंपरी-चिंचवडमध्ये स्थायिक झालेल्या खान्देशी बांधवांसाठी एकत्र येण्याचा आणि आपल्या संस्कृतीचा अभिमान वाटून घेण्याचा एक भावनिक दुवा आहे. यादरम्यान विविध उपक्रमांचं आयोजन करण्यात आलं आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**